**ARYAVART SHODH VIKAS PATRIKA**
RNI TITLED NO. UPBIL**04292**
RNI REG. NO. UPBIL/**2014/66218** **PP. No.- 88-91**
**I S S N NO. - 2347 – 2944 (Print)**
**e–I S S N NO.- 2582 – 2454 (Online)**
**Vol.-20, No.- I, Issues-39, YEAR- Jan.-March 2026**

# भारतीय ज्ञान परंपरा नवीन शिक्षण धोरण २०२० आणि शाश्वत विकासः प्राच्यविद्या आणि ऐतिहासिक दृस्टीकोनातून विष्लेषण

**बालाजी केंद्रे**
प्राध्यापक– समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई (महाराष्ट्), भारत

**Received-30.01.2026, Revised-08.02.2026, Accepted-14.02.2026**
**E-mail:balaji.kendre@sociology.mu.ac.in**

***सारांशः गोषवारा–*** *कोणताही समाज आपला इतिहास विसरून विकसित होत नाही. याच अनुशंगाने आशिया खंडातील भारतीय समाज प्राचीन काळापासून ते आधुनिक कालखंडा पर्यंत वेगवेगळ्या टप्यावर विविध स्थित्यंतरातून वाटचाल करताना आढळून येत आहे. प्राचीन काळातील जीवन पद्धती, सामाजिक संस्था, परंपरा, ज्ञान संस्कृती या मध्ये काळानुरूप अमुलाग्र बदल झालेले दिसुन येतात. याचा परिणाम कालांतराने मानवी जिवनाच्या विविध संस्था, संस्कृती आणि विविध क्षेत्रावर होत असतो.मानवी बुद्धिमता इतर सजीवापेक्षा नैसर्गिकपणे वेगळी असल्याने प्राचीन कालापासून मानव वेगवेगळ्या पद्धतीने स्वताचा विकास करण्यासाठी बुद्धी सर्जेणपणे वापरत आहे. या तत्वानुसार मानवाच्या विकासाच्या प्रक्रियेत नैसर्गिक साधनाचा आणि नैसर्गिक शक्तीचा प्रभाव मानवी जीवणार सर्वात मोठा आढळून येतो. भौगोलिक विविधता आणि मानवी संस्कृती (जीवन जगण्याची पद्धत) हे मानवी जीवनातील मुलभूत घटक महत्वाचे मानले आहेत. असे असले तरी आधुनिक कालखंडात जास्त प्रमाणात विज्ञान, तंत्रज्ञान, औदयोगीकरण,नागरीकरण आणि आधुनिक शिक्षण यांच्या विकासामुळे समाजात जास्त प्रमाणात अमुलाग्र बदल होत असताना आपणास अनुभव येत आहेत. सध्याच्या परिस्थितीत 'विकास' पुढच्या पिढ्याना जगण्यासाठी आवशक संसाधने आणि सुधृढ वातावरण निर्माण करणारा असावा तो विनाशकतेकडे घेऊन जाणारा नसावा या भावनेतून विकासाच्या प्रक्रियेकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पहिले जात आहे.'शाश्वत विकास' ही संकल्पना विकासाच्या सर्वच क्षेत्रांत चर्चिली जाणारी संकल्पना झाली आहे, यात शिक्षण व्यवेस्थेची भूमिका महत्वाची असते याची जाणीव सर्वाना झालेली दिसुन येत आहे . याच अनुषंगाने 'समावेशक विकास' ही महत्वाची बाब महत्वाची मानली जात आहे. याच दृष्टिकोनातून भारतीय ज्ञान परंपरा अध्यन, शिक्षण, शाश्वत विकास आणि विकसित भारत याचा सबंध समजुन घेण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केला आहे.*

*कुंजीभूत शब्द/मुख्य शब्द– भारतीय ज्ञान परंपरा, संस्कृती, शिक्षण आणी नवीन शिक्षण धोरण–२०२०,समावेशक आणि शाश्वत विकास।*

**प्रस्तावना–** कोणताही मानव/व्यक्ती हा दोन द्वंद्वा मध्ये आपले जीवन जगत असतो, यामध्ये आध्यत्मिक (पारलौकिक) श्रद्धापणे आणि ऐहिक (भौतिक) वास्तविकपणे जीवनाचा जगण्याचा समावेश होतो. या दोन्ही बाबी मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्वाच्या मानल्या आहेत. याला कोणीही अपवाद दिसत नाही करण मानव अन्न वस्त्र निवारा प्रमाणे श्रद्धा/धारणा शिवाय जगु शकत नाही. मानवी समाज जीवनामध्ये इतर सामाजिक घटक जसे भाषा, शिक्षण, संस्कृती, परंपरा ह्या मुलभुत असुन हे समाज जीवनात महत्वाची भूमिका पार पाडत असतात. मानवी सामाजातील कोणत्याही संस्कृतीचे स्वरूप साधारणपणे हे परिवर्तनशील असते आणि ती सतत बदलत असते. याच प्रमाणे भारतीय संस्कृतीचे दर्शन हे भारताच्या वैभवशाली परंम्परा आणि त्याच्या वारसा मध्ये आढळते. भारताचे वैशिषटे म्हणजे भारतात विविध प्रकारच्या विविधता आहेत. जसे भौगोलिक, धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक, सामाजिक ई. सर्वात महत्वाचे म्हणजे एम. एस.गोरे (२००२) यांच्या निरीक्षेना नुसार 'विविधतेत एकता' हे भारताच्या भारतीय ज्ञान परंपरा बाबतचे ब्रीदवाक्य असुन आजही वास्तवात आपण सर्व हे अभिमानाने सांगतो जगतो आणि जपतो आहोत. भारतीय प्राचीन जीवनाबाबत पुरातत्वीय आणि प्राच्याविद्या शाखीय पुरावे आजही आपल्याजवळ उपलब्ध आहेत त्याला आपण सांस्कृतिक वारसा म्हणुन आपण संवर्धन केले आहेत. भारतीय समाज व्यवस्थेचे स्वरूप हे गुंतागुंतीचे असुन ते सतत बदलत आहे (राम अहुजा २००२, एन के बोस १९७५). मानव निर्गाचा भाग असुन आणि उदरनिर्व्हासाठी पूर्वी पासुन मानवास निसर्गावर अवलंबुन राहावे लागले, म्हणुन निसर्गाचा मानवी जिवनावर खुप प्रभाव आजही दिसुन येतो. निसर्ग स्वताच्या नियामामे चालतो परंतु काही अंशी मानवाच्या घडामोडींचा व कार्याचा त्यावर कमी अधिक प्रभाव पडतो. या उलट निसर्गाचा मानवी जिवनावर जास्त प्रभाव असतो तो या पूर्वीही होता आणि आजही आहे. भारतातील आणि महाराष्ट्रातील जीवसृष्टी आणि पर्यावरण हा समृद्ध वारसा लाभलेला आहे, विजया वाड (२०११). भारतीय समाज जीवन समजुन घ्याचे असेल तर आपणास समाजाचा इतिहास, भौगोलिक रचना समजुन घेणे महत्वाचे आहे.

भारताचा इतिहास प्राचीन, मधेयुगीण, आणि आधुनिक या कालखंडात विभागला असुन तो वास्तुनिस्ठ पणे समजुन घेणे गरजेचे आहे. प्राचीन भारतात मानव निसर्गाच्या जास्त सानिध्यात राहत असलेने त्याचेवर निसर्गाचा प्रभाव असत होता म्हणुन निसर्गाला अनुरूप जगण्याचा प्रयत्न मानव सतत करत आलेला आहे. पूर्वीपासून अप्रत्याशित असलेने त्याला समजणे कठीण होते, ते आजही काही प्रमाणात आहे. निसर्ग प्रभावी असलेने निसर्गनियमानुसार अनुरूप जीवन जगण्याचा प्रयत्न मानव करत होता. म्हणुन प्राचीन आणि मध्य युगीनकालखंडात मानवी जीवन जगण्याच्या पद्धतीत झालेले बदलांची गती ही फार संथगतीने ('गोगलगाय' पद्धतीची) होती, असे म्हणता येऊ शकते. तसेच, वयक्तिक व सामाजिक जीवन अनिश्चित, काहीअंशी अशास्वत आणि संघर्षमय होते, जीवनात भटकंती होती, जी आजही काही प्रमाणात आढळते. मानवी उत्क्रांतीच्या काळात जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी मानवास खुप परिश्रम घ्यावे लागले, त्यामुळे जिवनात अमुलाग्र बदल होऊन जंगल जमिनीचा वापर शेती करण्यासाठी करणे, शिकार करणे, दगडाची हत्यारे बनवणे, जंगली प्राण्यांना पाळीव बनवणे आणि त्यांचा विविध तऱ्हेने वापर करणे, पारंपारिक बंधारा बांधुन पाणी साठवणे व व्यवहारिक आणि मूल्याधारित शिक्षण या मुळे मानवी संस्कृती मध्ये अमुलाग्र बदल झालेले दिसतात, जसे की अन्न धान्ये ची उपलभ्दता वाढली आणि त्या मुळे जास्त विकसित होण्यची स्वप्ने साकार होऊ लागली. याचाच परिणाम मानव आपला जीवनाचा दर्जा सुधारण्याच्या साठी स्थाईक वसाहती करून ऊन, वर पाऊस या पासुन संरक्षन मिळवण्याचा प्रयत्न करत होता आणि जीवनामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करत होता. याच काळात मानवी जीवन देवाने निर्माण केले असुन दैवी शक्ती अस्तित्वात आहे अशी धारणा बाळगून धार्मिक मुल्ये तयार केली गेली. कालातराणे आपलेच धार्मिक मुल्ये श्रेष्ठ असुन सर्व मानव जातीने ते आचरणात आणावीत असे विचार व्रधिगत करण्याचा प्रयत्न केला गेला आणि आजही होताना आपणास आढळतो. यातच टोकाचे संघर्ष वाढत गेलेने भेदभाव, उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिस्ट, अन्याय, एकमेकाशी वैर वाढत जाऊन कालांतराने वेगवेगळ्या पंथाची/धर्माची उत्पती झाली असावी. विकासाच्या प्रक्रियेत कालांतराने औदोगीक क्रांतीमुळे,नागरीकरण आणि सामाजिक आर्थिक विकासाची गती वाढली आणि मानवी जीवन कृत्रिम वातावरणात वाढू लागले, परिणामी या मुळे वेगवेगळे समूह एकमेकावर वर्चस्व मिळवण्यासाठी संघर्ष करत गेले आणि या मधून एकमेकावर अन्याय करणे आणि स्वतः श्रेष्ठ आहोत हे लादण्याचा प्रयत्न झाले. शेवटी दुसर्या महायुद्ध नंतर लोकशाही हा पर्याय पुढे आला आणि सर्वत्र रूढ झाला. यातून सर्वानिक

**अनुरूपी लेखक/ संयुक्त लेखक**

I S S N NO. - 2347 – 2944 (Print)
e–I S S N NO.- 2582 – 2454 (Online)
Vol.-20, No.- I, Issues-39, YEAR- Jan.-March 2026

हिताच्या बाबीवर चर्चा आणि धोरण महत्वाचे मानले जात आहे. या मध्ये स्थानिक संस्कृती, स्थानिक समुदाय, स्थानिक जीवन याला महत्व दिले आहे. भारतीय सामाशात्राचे जनक गोविंद सदाशिव घुर्ये यांनी भारतीय समाजाचा अभ्यास प्राच्यविद्या द्रष्टीकोनातून केला आहे. यासाठी प्राचीन धर्म ग्रंथ आणि इतिहास शात्र हे त्यांच्या अभ्यास पद्धतीचे मुखे स्रोत होते (बी. के. नागला २०१२). याच संदर्भातभारतीय संस्कृतीची उत्पती आणि विकास या बाबत दामोदर धर्मानंद कोसंबी (१६६२–२०१६) यांचे योगदान महत्वाचे आहे. त्याच बरोबर योगेंद्र सिंघ (२०२०) यांच्या अभ्यासात त्यांनी भारतीय परंपराच्या वैशिष्ठ्य घटक म्हणुन, श्रेणीरचना, पावित्र्य, सातत्य, आणि उत्कृष्टता हे नमूद केले आहेत. यामध्ये बदल हे प्रामुख्याने अंतर्गत आणि बहिर्गत प्रक्रियेमुळे होतात हे स्पस्ट केले आहे.

**भारतीय ज्ञान परंपरा–** भारतीय ज्ञान परंपरा व्यक्ती आणि समाज विकासासाठी परस्पर पुरक मानल्या असुन त्याचे महत्व आजच्या आधुनिक जीवनात महत्वाचे मानले जात आहे. भारतीय ज्ञान परंपरांचे आणि सामाजिक जीवनाचे दर्शन हे वैदिक आणि उत्तर वैदिक (२५०० ते १५०० बी. सी) आणि 'द एज ऑफ लेटर समिहता' या मध्ये ब्राम्हाज आणि उप्निशेदाज (१५०० ते ५०० बी. सी) या कालखंडातील साहित्यातून होते. म्हणूनच वैदिक परम्पाचे, ज्या हिंदू धर्माचे आधारभूत ज्ञान मानल्या जातात त्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. या मध्ये प्रामुख्याने चार वेद आहेत. 'वेद' म्हणजे ज्ञान असा अर्थ आहे. ऋग्वेद हा ग्रंथ सर्वात प्राचीन वेदग्रंथ आहे, ज्यात देवतांच्या स्तुतीसाठी मंत्र आहेत. यजुर्वेद हा यज्ञाच्या विधी आणि मंत्रां बाबतचा संग्रह आहे. सामवेद ऋग्वेदातील मंत्रांचे गायन, संगीत या बाबतचा आधार आहे. अथर्ववेद हा दैनंदिन जीवन, आरोग्य, आणि औषधांशी संबंधित मंत्र याचा ग्रंथ आहे. याचः अर्थ असा की भारतीयज्ञान परंपरा सर्वार्थाने समग्र मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी विचार करणाऱ्या आहेत. या सर्वच सखोल आणि सविस्तर गाभा पुढे उपनिषेध आणि पुराण ग्रंथात सविस्तर वर्णन केला आहे. या मध्ये प्रमुख्याने समग्र जीवन मुल्य, आरोग्य, संस्कृती, आध्यत्मिक जीवन, सर्वसमावेशकता, मानववाद याचा समावेश होतो. भारतीय ज्ञान परंपरे मध्ये गौतम बुद्धाचे योगदान अनन्यसाधारण आहे. डॉ. भीमराव आंबेडकर (२००८ मराठी आवृत्ती) यांनी त्यांच्या भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात गौतम बुद्धाच्या मानवता वादी विचाराचे दर्शेन मांडले आहे.

**भारतीय शिक्षण श्रम विभागणी सामाजिक व्यवस्था–** कोणत्याही समूहाला किंवा समाजास त्याचे सातत्य टिकून ठेवायचे असेल तर त्यास नवीन जन्माला येणाऱ्या सभासदास व्यक्तीस त्याला जीवन जगण्यासाठी आवशक असणारे संस्कार, मुल्ये, सामाजिक चालीरिती आणि व्यवहारिक जगण्याचे शिक्षण देणे गरजेचे असते, यालाच सामाजिक ज्ञान संक्रमित करणे (सामाजीकरण) असे म्हणले जाते. प्राचीन भारततीय शिक्षण पद्धतीत विशेषता 'गुरुकुल पद्धतीत 'गुरु आणि शिष्य' परंपरा महत्वाची मानली जाते. प्राचीन काळातील नालंदा आणि तक्ससशीला ही विद्यापीठे जागतिक कीर्तीची आणि मानवी जीवन समृद्ध करणारी शिक्षण केन्द्रे भारतातीलच होती. याच दरम्यान भारतात बुद्धीझम चा विकास झाला आणि जगभर पसरला. वैदिक/हिंदू धर्मातील आश्रम व्यवस्था जीवनाचा आदर्श मानून आपले वयक्तिक आणि सामाजिक जीवन जगण्याची सुरुवात होते. साधरणपणे मानवाचे/व्यक्तीचे जीवन शंभर वर्ष गृहीत धरून ही त्यावेळी ही आदर्श व्यवस्था योजली होती. याची सुरुवात ब्रह्मचार्य आश्रमापासून होते. यामध्ये व्यक्तीने आपल्या संस्काराची सुरुवात कौटुंबिक मूल्य आत्मसात करून 'मात्र पित्र देव भव' माया बाप देवाचे पहिले रूप असुन त्याचा अशीर्वाद घेऊन पुढील सामाजिक संस्कार, मुल्ये, शिकण्यासाठी गुरूला शरण जाणे आणि त्या बरोबर दीक्षा घेणे महत्वाचे मानले आहे. या काळामध्ये बालाकास मानवी जीवन समृद्ध करण्यासाठी गुरूस दुसरा देव मानण्याची परंपरा आढळून येते. याच दरम्यान गुरु आपल्या अनुभवाने आणि ज्ञानाणे शिष्यास ज्ञानी बनवण्याचा प्रयत्न करतो. याच दरम्यान वेक्तीगत जीवनाबरोबर सामाजिक आणि आध्यत्मिक जीवन कसे समृद्ध आणि संपन्न कसे करत येईल यांचे संस्कार, मुल्ये आणि व्यवहारिक जीवन जगण्याचे धडे शिकवले जायचे. यालाच त्या काळी सर्वांगीण शिक्षण असे संबोधले जात होते, अशी शिकवण वयाच्या पंचवीस पर्यंत दिली जात असत, या मध्ये आध्यत्मिक आणि व्यवहारिक आणि सामाजिक मुल्यानचा समावेश होत असे. या नंतर मानवी जीवनातील दुसरी आणि महत्वाचा टप्पा म्हणजे ग्रहस्त आश्रम होय, ज्या मध्ये व्यक्ती आपल्या जीवनातील मुलभूत ज्ञान प्राप्त केले नंतर त्यास ग्रहस्ती जीवन जगण्यासाठी सुरुवात करण्यासाठी विवाह एक संस्कार म्हणुन विवाह करणे महत्वाचे मानले जाते. परंतु सर्वचजण ब्रह्मचार्य अवस्था स्वीकारतील असे काही बंधन या मध्ये आढळून येत नाही. ज्यांनी विवाह संस्कार करून ग्रहस्ती जीवनात प्रवेश केला आहे, त्यास पती आणि पत्नी म्हणुन अपत्यास जन्म देणे, मुलास सुरुवातीचे संस्कार देणे ही महत्वाची जवाबदारी पार पडणे अपेक्षित धरलेआहे. हिंदू धर्मात विवाह एक संस्कार मानला आहे आणि असे असले तरी कालांतराने विवाहाचे विविध प्रकार (एकविवाह, बहुविवाह, अंतर्गत विवाह, बहिर्गत विवाह आणि सद्य पुन्हा एकविवाह ई.) वाढत गेलेले आढळून येतात. कालांतराने गोत्र पद्धती ज्या मध्ये सगोत्र आणि बाह्य गोत्र विकसित झालेचे दिसुन येते. भारतीय परंमपरा मध्ये सगोत्र विवाह वर्ज मानला असुन आजही काही लोक बाह्य गोत्रात विवाह करणे पसंद करतात. परंतु कालांतराने सगोत्र विवाह मान्यता प्राप्त होत असताना आढळून येतात. यानंतर तिसरी आणि महत्वाची व्यवस्था म्हणजे वानप्रस्थ अवस्था या मध्ये व्यक्तीने आपल्या प्रपंचा मधून निवृती घेऊन त्यागाच्या भावनेने वनात अधिवास करणे आपेक्षित होते, या दरम्यान पूर्ण विरक्ती घेतली जात नसे तर या दरम्यान सामाजिक जीवनात सक्रीये होऊन 'वर जण हित ध्येयंम' म्हणुन कार्येरत असणे अपेक्षित आहे, ज्या मध्ये कोणत्याही सामाज कल्याणाच्या कार्यात स्वताला झोकून घेणे आणि स्वत पेक्षा सामाज हीताला प्राधान्य देणे क्रमप्राप्त मानले आहे. या नंतर माणसाच्या जीवनातील शेवटचा चौथा टप्पा म्हणजे सन्यास आश्रम मानला आहे. या मध्ये व्यक्ती सामाजिक (ऐहिक) जीवनातून पूर्णपणे विरक्त अलग होऊन संन्यास घेऊन आध्यत्मिक जीवनाकडे वाटचाल करत असतो. या परम्परातून व्यक्तीने फक्त ऐहिक जीवनच जीवन आहे हे सत्य नसुन परलौकिक किंवा अध्यात्मिक जीवन जगणे महत्वाचे आहे, अशी शिकवण विकसित झाली असल्येचे दिसुन येते.

याच दरम्यान एकाच वेळी भारतात वर्णव्यवस्था एक सामाजिक श्रम विभजनाची (कामाची वाटणी) व्यवस्था म्हणुन अस्तित्वात येऊन वेगळे रूप धरण करत होती. या मध्ये सुरवातीला चार वर्णांची निर्मिती होऊन पुढे कालानतराणे ही व्यवस्था भारतीय जीवनात रूढ झाली. या मध्ये प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शुद्र या वर्णाचा समावेश आढळतो. या मध्ये प्रत्येक वर्णास आपआपल्या वर्णानुसार कामाची विभागणी केलेचे आढळते. सर्वात महत्वाचे म्हणजे आरंभीच्या काळात वर्ण व्यवस्था ही वर्ग (व्यक्तिगत कौशल्य, मेहनत द्वारे बदलता येणारी) या स्वरूपात कार्येरत होती, या सर्व बाबींतुन भारतीय ज्ञान परंपरा विकसित झालेचे दिसुन येते. कालांतराने विशेशताः उत्तर वैदिक काळामध्ये लोकसंख्या वाढ झालेने आणि बदलत्या काळात मानवाच्या गरजामध्ये बदल झालेने या मध्ये अमुलाग्र बदल झालेले दिसुन येतात. वर्ण व्यवस्थेत नंतरच्या काळात पंचम नावाने अतिशुद्र वर्ण अस्तिवात आल्याचे आढळते, पूर्ण श्रम विभाजनी चा आधार जन्माच्या आधारावर ठरवण्यास सुरुवात झालेने सामाजिक गतिशीलता कमी झाले आणि समाजात जातीय आणि पुरूष प्रधान व्यवस्था निर्माण झाली, परिणामी कनिस्ट जाती आणि स्त्रिया यांचेबरोबर भेदभाव, पिळवणूक आणि अत्याचार सुरु झाला असे दिसते. याच दरम्यान विविध धर्माची निर्मिती झाली जसे बुद्धीझम, जैनिझम, आणि शिखीझम ई. आणि नंतर काही बाहेरील धर्माचे जसे ईस्लाम,

I S S N NO. - 2347 – 2944 (Print)
e–I S S N NO.- 2582 – 2454 (Online)
Vol.-20, No.- I, Issues-39, YEAR- Jan.-March 2026

ख्रिस्चेन, पारसी ई. भारतात आगमन झाले, परिणामी विविध अनुयायिनी आपापली वेगळी जीवन पद्धती आपल्या स्तरावर स्वीकारली आणि अंगिकारली, याचा अर्थ असा नाही की भारतात धर्म आणि वर्ण व्यवस्थे बाहेर इतर समाज अस्तित्वात नव्हते, असे नाही तर, या मध्ये समाजातील डोंगराळ, जंगल आणि गावाबाहेर (गावापासून अलिप्त) असणारे भटके समुदाय, आदिवासी सुमदाय होते. यांच्यावर मुख्य प्रवाहातील धर्म व्यस्थेचा प्रभाव नगण्य किंवा कमी प्रमाणात राहिला, परन्तु नवीन वर्ण व्यस्थेपपासुन ते खुप दुर (सबंध) असलेलेने ते भारतीय ज्ञान परंपरेचा भाग असुनही वेगळे राहिले होते आणि आजही काही प्रमाणात आहेत. अलीकडच्या काळात विशेता ब्रिटीश आगमना नंतर आधुनिक काळात जगभरात मानवी समाजाच्या विवध क्षेत्रांत अमुलाग्र बदल होताना आपणस दिसत आहेत.

ए. एस. आळतेकर (१९५६,२००५). यांचं मते हिंदू समाजातील स्त्रियांची स्थिती ही वैदिक कालखंडामध्ये इतर तथाकथित शभ्याता पेक्षा चांगली होती. विवाह हा एक संस्कार म्हणुन पाळला जात होता. असे असले तरी मुली पेक्षा मुलाचा सामाजिक स्तर वरचा मानला होता. मुलीनाही भ्रमचार्ये पाळून शिक्षेन घेण्याचा अधिकार होता. उच्च कुलीन कुटुंबामध्ये बहुपात्नीत्व अस्तिवात होते, परंतु एक विवाह हा सामान्यपणे नियम होता. या काळातही स्त्रीला संपती बाळगण्याचा अधिकार कमी प्रमाणात होता. परंतु स्त्रियांना समाजाच्या विविध कार्यात सहभागी होण्याचे स्वातंत्र्य होते .

महात्मा क. गांधी (१९६२) यांनी त्यांच्या यंग इंडिया या पुस्तकात 'स्वराज' ही संकल्पना मांडली आहे. त्यांच्या मते स्वराज म्हणजे स्वताचे राज्ये, स्वताशी संयम, प्रतिबंध, सर्व प्रतिबंधा पासुन स्वातंत्र म्हणजे स्वातंत्र नव्हे. सर्व देश स्वतः खाऊ शकतात, श्वास घेऊ शकतात, आणि स्वताच्या घडामोडी चे व्यवस्थापन करू शकतात म्हणुन स्वराज हा लोकांचा पाहिजे, राजेकर्ते हे लोकांच्या इच्छेनुसार काम करणारे पाहिजेत आणि जेंव्हा ते सत्तेचा दुरुपयोग करतील तेंव्हा लोक प्रतिकार करतील असे स्वातंत्र्य असावे. स्वातंत्र म्हणजे ब्रिटीशांचे अनुकरण असणारे नसावे तर पूर्ण स्वशासन असावे. यासठी शिक्षेनात मानवी मुल्ये असावीत जे लोकांचे जीवन प्रतिबिंबित करतात. यावरून आपणास थोर महात्म्याचे विचार समजतात.

**समावेशक शाश्वत विकासासाठी शिक्षण–** मुळात प्राचीन आणि आधुनिक भारतीय संस्कृती ही विविधता आणि सर्व समावेशकता या साठी ओळखली जाते. भारतीय समाज हा गतिशील समाज आहे. परंतु स्वातंत्र्यापूर्वी सरंजामी आणि ब्रिटिशांच्या काळात (वसाहतवादी) लादलेल्या आणि प्रशासनिक ज्ञान जे सरंजामी व वसाहतवादी काळास अनुरूप करण्यासाठी आवशक असणारे कारकुन तयार करणाऱ्या शिक्षण व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल करणे काळाची गरज होती. कारण जरी ही शिक्षण पद्धती काही ठिकाणी काही प्रमाणात विकासासाठी पूरक असली तरी याचा फारसा परिणाम प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा आणि मूल्याशी शी सुसंगत आढळला नाही किंवा विकासाच्या प्रक्रियेत सकारात्मक झालेला दिसुन येत नाही. म्हणुन या मध्ये अमुलाग्र बदल करणे आवशेक होते. याचाच परिणाम स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने स्वताचे १९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षेणिक (सर्वोभम) धोरण लागू केले आणि दुसरे महत्वाचे शैक्षेणिक धोरण जे नवीन राष्ट्रीय शैक्षेणिक धोरण २०२० म्हणुन ओळखले जात आह ते एक मोठ्या प्रमाणात सामाजिक,आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदल घडवून आणणारे दुरलक्षी व्यापक धोरण मानले आहे. या मध्ये प्रामुख्याने शिक्षण संस्थाना स्वायातात देणे, आंतरविद्याशाखीय शिक्षनास चालना देणे, कौशल्ये शिक्षेनावर भर देणे, स्थानिक संस्कृती चे संवर्धन आणि जतन करणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे याचा समावेश दिसुन येतो. प्राचीन आणि मध्युगीन भारतातील प्राचीन शिक्षेन पद्धती ज्या मध्ये व्यक्ती आणि समाजाचा सर्वांगीण विकास हे ध्येये होते जे आज जागतिक ध्येय झाले असुन भारतातील प्राचीन शिक्षण पद्धती चे पुनर्जीवन करणे गरजेचे होते. अर्थातच लोककल्याण आणि लोकशाही बळकट करण्यासाठी आणि शाश्वत विकासासाठी लोकजीवन, लोकसंस्कृती, मानवी मूल्याधारित शिक्षण, न्याय, समानता, स्वातंत्र्य हे बळकट करणे महत्वाचे आहे. या मध्ये प्रामुख्याने भारतातील प्राचीन ज्ञान परंपरा आणि शिक्षण व्यवस्था आधुनिकतेच्या दृष्टीने पुनर्जीवित करण्यासाठीचा महत्वाचा प्रयत्न आहे. या मध्ये भारतीय संस्कृतीची ओळख, (वसुन्धकम कुटूम्ब्कम) जग हे कुटुंब आहे हा विचार रूढवने, भारताने जागतिक स्तरावर दिलेले योगदान समजुन घेणे, जागतिक आणि भारताच्या शाश्वत विकसासाठी कटिबद्ध असणे, जागतिक शांतता, सहकार्ये, व्यापार वाढवणे आणि मानवता वाद वाढवणे जे भारतीय संस्कृतीच्या मूल्याशी सुसंगत आहे ते स्वीकारणे ई महत्वाचे आहे. याच संदर्भात टी. व्ही. कटीमनी (२०२२) यांच्या अभ्यासानुसार भारताचे नवीन शैक्षेणिक धोरण हे एक गेम चेंजर धोरण आहे.

**समारोप**– भारत हा मुळात विविधतेने नटलेला आणि मानवतावादी संस्कृतीचा लोकशाही समाज आहे. भारतातील प्राचीन ज्ञान परंपरा गतिशील आहेत आणि आधुनिक विचार सतत शाश्वत विकासाच्या बाजूने प्रयत्नशील आहेत. जागतिक पातळीवर आरोग्य क्षेत्रांत यामध्ये आरोग्य धन संपदा मानून आज भारतातील योगा, आयूर्वेद, ओर्गानिक फूड, जगभर सुप्रसिद्ध होत आहे, त्याच बरोबर भारतातील संस्कृती ज्या मध्ये निसर्गपूजा केली जाते त्या मुळे निसर्ग संवर्धन, संगोपन याला चालना मिळते आहे. शिक्षण क्षेत्रांत मोठे बदल घडून आणले आहेत. विज्ञान तंत्रज्ञान आणि जागतिक व्यापार या मध्ये भारताचा सहभाग यामध्ये मोठी वाढ होत आहे आणि आर्थिक सुधारणा मुळे भारताची अर्थवेवस्था वेगाने विकसित होत आहे. या अनुषंगाने नवीन राष्ट्रीय शैक्षेणिक धोरण– २०२० ज्या मध्ये भारतीय ज्ञान सामाविस्ट करून स्थानिक लोकसहभाग वाढवुन भारतीय समाजाची, राष्ट्राची जागतिक पातळीवर नवीन ओळख निर्माण करण्याच्या आणि एक सर्व समावेशक विकसित राष्ट्र आणि समाज घडवण्याच्या हेतूने तयार केले असलेने, त्याची अंमलबजावणी होऊन सकारात्मक दृष्ट्या परिणाम येणाऱ्या काळात दिसुन येतील असे प्रयत्न सर्व स्तरातून होताना दिसत आहेत.

## सन्दर्भ ग्रन्थ सूची

1. ए.एस. आळतेकर (१९५६,२००५). द पोझीशन ऑफ उमेन इन हिंदू सिविलायझेशन (फ्रॉम प्रिहिस्टरिक टाईम् टू द प्रेसेंट डे. मोतीलाल बनारसीदास पब्लीशेर्स प्रायव्हेट लिमिटेड. न्यूदिल्ली.
2. महात्मा क. गांधी (१९६२). व्हिलेज स्वराज. नवजीवन पब्लिशिंग हाउस. अहमदाबाद.
3. एम. एस.गोरे (२००२). युनिटी इन डायवरसिटी. द इंडिअन एक्षिपरियनस इन नेशन दृबिल्डींग. रावत पब्लीकेशेन, न्यूदिल्ली.
4. टी. व्ही. कटीमनी (२०२२ ). एन ई पी –२०२० द गेम चेंजर . मेरू इन्फो सोलुसेंस, बेंगळूरू.
5. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (२००८ मराठी आवृत्ती अनुवादक घनश्याम टळवटकर, म .भी चिटणीस आणि शा.स .रेगे). भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म . प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.
6. दामोदर धर्मानंद कोसंबी (१९६२–२०१६). मिथ आणि रियालिटीः स्टडीज इन द फॉरमेशेन ऑफ इंडिअन कल्चर. सेज पाब्लीकेसंस. न्यूदिल्ली.
7. निर्मल कुमार बोस (१९७५). द स्त्क्चेर ऑफ हिंदू सोसायटी. ओरीएंत लोन्मान. न्यूदिल्ली.

8. बी .के नागला (२०१२ दुसरी आवृत्ती). इंडिअन सोसीओलोजीकॅल थॉट. रावत पाब्लीकेसंस. जयपूर, न्यूदिली.
9. योगेंद्र सिंघ (२००२). मॉडरनायझेसेन ऑफ इंडिअन ट्रेडीसेन. ए सिस्टम्याटीक स्टडी ऑफ सोसेल चेंज.रावत पब्लीकेशेन, न्यूदिल्ली.
10. राम अहुजा (२००२ ). इंडिअन सोशेल सिस्टम. रावत पाब्लीकेशनस. जयपूर, न्यूदिल्ली.
11. विजया वाड (२०११). कुमार विश्वकोश. जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग– १. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ. महाराष्ट्र शासन.

*****